।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone: (02462) 229294** **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**
**Fax : (02462) 229572** **e-mail:directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. : परीक्षा/संपवमूमं/२०२०—२१/४०४ दिनांक: ०२/१०/२०२०

## तातडीचे परीपत्रक: उन्हाळी २०२० परीक्षेच्या सूधारीत कार्यपध्दती

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी,
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली

### विषय : उन्हाळी २०२० परीक्षेच्या सूधारीत कार्यपध्दती बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी—२०२० पदवी, पदव्युत्तर, पदविका व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेणेसाठी सविस्तर कार्यपध्दती ठरविणेसाठी दिनांक ०२/१०/२०२० रोजी मा. परीक्षा व मुल्यमापन मंडळाची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांची पाचव्या व सहाव्या सत्राची, चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षार्थ्यांची सातव्या व आठव्या सत्राची, पाच वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षार्थ्यांची नवव्या व दहाव्या सत्राची आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तिस—या व चौथ्या सत्राची परीक्षा ही विद्यापीठामार्फत घेणार आहे याचे सूधारीत वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे

२. बहिस्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या व्दितीय वर्षाचे विद्यार्थी व एक वर्षीय पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठामार्फत घेण्यात येतील.

३. तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्रास परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या तिस—या व चौथ्या सत्राची, चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्रास परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या पाचव्या व सहाव्या सत्राची, पाच वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्रास परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या सातव्या व आठव्या सत्राची तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्रास परीक्षार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या व दुस—या सत्राच्या बॅकलॉगच्या विषयांची परीक्षा ही महाविद्यालय स्तरावर खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तारखेदरम्यान घेण्यात यावी. या परीक्षा विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेशित आहे त्याच महाविद्यालयाने ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात याव्यात.

४. पदवी, पदव्युत्तर (नियमित व बहिस्थ), पदविका व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० परीक्षेच्या नियोजित तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | परीक्षेचा कालावधी | गुणयादी, उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका, उत्तरसूची व ऑनलाईन पध्दतीने गुण विद्यापीठात सादर करण्याची अंतिम तारीख. |
|---|---|---|---|
| ०१ | पदवी अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी अंतिम सत्राच्या परीक्षेकरीता परीक्षार्थी आहेत आणि तिस—या व चौथ्या सत्राच्या अनुत्तीर्ण विषयाची सुध्दा परीक्षा देणार आहेत अशा तिस—या व चौथ्या सत्राच्या परीक्षार्थ्यांची परीक्षा (बी.ए.,बी.कॉम, व बी.एस्सी.) महाविद्यालय स्तरावर घेण्यात यावी. | ०७/१०/२०२० ते १८/१०/२०२० | २४/१०/२०२० |
| ०२ | पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी अंतिम सत्राच्या परीक्षेकरीता परीक्षार्थी आहेत आणि पहिल्या व दुस—या सत्राच्या अनुत्तीर्ण विषयाची सुध्दा परीक्षा देणार आहेत अशा पहिल्या व दुस—या सत्राच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात याव्यात. याबरोबरच चार वर्षीय अभ्यासक्रमांच्या सत्र पाच व | २१/१०/२०२० ते २८/१०/२०२० | ३०/१०/२०२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | सहा तसेच पाच वर्षीय अभ्यासक्रमांच्या सत्र सात आणि आठ यांच्याही परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात याव्यात. | | |
| ०३ | तीन वर्षीय पदवी (बी.ए.,बी.कॉम, व बी.एस्सी.) अभ्यासक्रमाच्या पाचव्या व सहाव्या सत्राच्या परीक्षा विद्यापीठामार्फत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात येतील. या परीक्षा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर संपन्न होतील. | १९/१०/२०२० ते ३१/१०/२०२० | ...... |
| ०४ | पदव्युत्तर व व्यावसायिक दोन वर्षीय अभ्यासक्रमाच्या तिस—या व चौथ्या सत्राच्या, तीन वर्षीय व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या पाचव्या व सहाव्या सत्राच्या, चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या सातव्या व आठव्या सत्राच्या आणि पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या नवव्या व दहाव्या सत्राची परीक्षा विद्यापीठामार्फत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात येतील. या परीक्षा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर संपन्न होतील. | १५/१०/२०२० ते २०/१०/२०२० | ........ |
| ०५ | बहिस्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या व्दितीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठामार्फत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घेण्यात येतील. या परीक्षा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर संपन्न होतील. | २४/१०/२०२० ते २८/१०/२०२० | .. |
| ०६ | बहिस्थ अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षाच्या परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांचे जे बॅकलॉगचे विषय राहीलेले असतील अशा विद्यार्थ्यांची परीक्षा संबंधीत महाविद्यालयाने महाविद्यालय स्तरावर | १९/१०/२०२० ते २३/१०/२०२० | २७/१०/२०२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने बहुपर्यायी (M.C.Q.) प्रश्नसंच देवुन घ्याव्यात. | | |

५. वरील प्रमाणे बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा घेतांना महाविद्यालयाने तो विद्यार्थी उन्हाळी—२०२० परीक्षेसाठी अंतिम वर्ष/अंतिम सत्रास आहे याची खात्री करावी व त्यानुसारच परीक्षा घ्यावी.

६. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात येणा—या उन्हाळी —२०२० पदवी व पदव्युत्तर सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा बहुपर्यायी (M.C.Q.) पध्दतीनुसार असेल. ज्यामध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता ४० गुणांकरीता ४० प्रश्न असतील व त्याकरीता एक तासाचा वेळ असेल. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा बहुपर्यायी (M.C.Q.) पध्दतीनुसार असेल. त्यामध्ये एकुण ५० प्रश्न असतील त्यापैकी ४० प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडावयाचे आहेत. यासाठी एक तासाचा वेळ देण्यात येईल. सदर परीक्षा ही ऑनलाईन/ऑफलाईन अशा दोनपैकी विद्यार्थ्याने निवडलेल्या कोणत्याही एका पध्दतीने विद्यार्थ्यांस देता येईल.

७. या परीक्षेसाठी निगेटिव्ह मार्कींग असणार नाही.

८. महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणा—या बॅकलॉगच्या परीक्षेसाठी विद्यापीठामार्फत उत्तरपुस्तीका (ओ.एम.आर) पुरविण्यात येणार आहेत. त्याचाच वापर परीक्षेसाठी करण्यात यावा. या उत्तरपुस्तीकांची तपासणी परीक्षा संपल्यानंतर दररोज मॅन्युअली पध्दतीने महाविद्यालय स्तरावर करुन विद्यार्थ्यांना गुणदान करावे. सदरील गुण परीक्षा विभागाने दिलेल्या ऑनलाईन लिंकव्दारे भरण्यात यावे व त्याची एक प्रिट घेवुन सदर गुणयादी विद्यापीठाकडे सादर करावी. त्यावर संबंधीत विषय शिक्षकांचे नाव, भ्रमणध्वनी व स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

९. वरीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर बॅकलॉगच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा संपन्न झाल्यानंतर वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विषयनिहाय उत्तरपुस्तीका व त्याचबरोबर ऑनलाईन सॉफटवेअरव्दारे डाउनलोड केलेली गुणयादीची साक्षांकीत प्रत व प्रश्नपत्रिकेच्या दोन प्रती व त्या प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका(Answer Key) इ. सिलबंद पाकीटामध्ये परीक्षा विभागास वरीलप्रमाणे दिलेल्या तारखांपर्यंत किंवा त्यापुर्वी सादर करावेत.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालय स्तरावर बॅकलॉग विषयांची परीक्षा दिलेली असेल अशा विद्यार्थ्यांची गुणयादी वरीलप्रमाणे देण्यात यावी व त्याचा पुरावा सुध्दा वरील उत्तरपुस्तीकेबरोबर परीक्षा विभागास पाठविण्यात यावा.

११. महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या बॅकलॉग विषयांची परीक्षा घेण्यासाठी संबंधीत विषयाचे शिक्षक उपलब्ध नसतील अशा महाविद्यालयांनी त्याच शहरातील किंवा तालुक्यातील इतर महाविद्यालयाच्या मदतीने त्या विषयाची प्रश्नपत्रिका तयार करुन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी. त्यासाठी तसे लेखी विनंतीपत्र संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पाठवावे व त्याची एक प्रत परीक्षा विभागास सादर करण्यात यावी.

१२. वरील प्रमाणे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अंतिम वर्षातील बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेणे यासाठी सर्व विषय शिक्षकांनी प्रश्नपत्रिका काढणे व त्याचे मुल्यमापन करणे हे महाविद्यालय स्तरावर करणे अनिवार्य राहील.

१३. वरीलप्रमाणे बॅकलॉगच्या महाविद्यालय स्तरावर संपन्न होणा—या परीक्षा या सर्व संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठातील संकुले, उपकेंद्र लातूर व परभणी, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली व कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास केंद्र किनवट, प्रस्तुत विद्यापीठ येथे संपन्न होतील. तसेच अंतिम वर्षाच्या दोन्ही सत्रांची, बहिस्थ अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षाची व एक वर्षीय पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठ स्तरावरुन घेण्यात येतील. यासाठी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावरच त्या परीक्षा संपन्न होतील.

१४. वरील नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठामार्फत ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणा—या परीक्षेच्या उत्तरपुस्तीकांचे मुल्यमापन विद्यापीठामध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे त्या उत्तरपुस्तीकांचे मुल्यांकन महाविद्यालय स्तरावर करण्यात येवु नये.

१५. उन्हाळी २०२० परीक्षा पार पाडण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांनी परीक्षेचे कार्य करणे अनिवार्य राहील.

१६. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे उन्हाळी २०२० च्या परीक्षा कालमर्यादेत दि.३१/१०/२०२० पर्यंत पूर्ण करुन निकाल जाहीर करावयाचे असल्यामुळे महाविद्यालय पातळीवर सर्व कामे वेळेत पार पाडुन सहकार्य करावे.

सबब, उपरोक्तप्रमाणे सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक सर्व संकुले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नोंद घेवुन ही बाब सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी व परीक्षा सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.

(डॉ. रवि एन. सरोदे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तूत विद्यापीठ.
२. मा.प्र—कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,म.रा, पुणे.
४. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
५. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
६. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
७. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ : यांना देवून कळविण्यात येते की सदर बातमी चारही जिल्हयातील वर्तमानपत्रामध्ये विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
८. उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, अधिक्षक/सहा. अधिक्षक, संगंणक कक्ष परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.